सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक-पोलीस-१३२४/ प्र. क्र.४७/पोल-५ अ दि. ३०/०७/२०२५.

**विषय** :- " शिक्षण सेवक" व "प्राथमिक शिक्षक" या पदावर केलेली पूर्वसेवा "पोलीस उप निरिक्षक" पदाच्या सेवेस जोडून देणेबाबत....
श्री. धनंजय सावताराम ढोणे, सहायक पोलीस निरिक्षक.

****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक-पोलीस-१३२४/ प्र. क्र.४७/पोल-५अ,दि. ३०/०७/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७३०१५४५२६६९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 02-08-2025 10:07:38
( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.
पोलीस अधीक्षक, लातूर / बीड.
कार्यासन अधिकारी, का.क्र. ४/५.

प्रत,
पोलीस महासंचालक, आस्थापना, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (आस्था-२).

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**"शिक्षण सेवक" व "प्राथमिक शिक्षक" या पदावर केलेली पूर्वसेवा "पोलीस उप निरीक्षक" पदाच्या सेवेस जोडून देणेबाबत...**
**श्री.धनंजय सावताराम ढोणे, सहायक पोलीस निरीक्षक**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पोलीस-१३२४/प्र.क.४७/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :-३० जुलै २०२५

**वाचा :-**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे आदेश क्र. जा.क्र./ जिप/ शिवि/ आस्था-३/४५२७/०३, दि.२९.०७.२००३
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे आदेश क्र. जा.क्र./जिप/शिवि/ आस्था-३/७८६३/०६, दि.०५.१२.२००६
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे आदेश क्र. जा.क्र./जिपउ/ शिक्षण/आ-८/८५/०६, दि.२४.०५.२००७
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे पत्र क्र. जा.क्र.जिपउ/ शिक्षण/आ-८/११०७/२००९, दि.२६.०६.२००९
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे पत्र क्र. जा.क्र.जि.पउ/शि/ आ/-७/१५६८/२०१०, दि.२७.०८.२०१०
६) मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सापनाई ता. कळंब जि. उस्मानाबाद यांचे पत्र दि.१८.०९.२०१०
७) पोलीस उप महानिरीक्षक, पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे आदेश क्र.पोमस/५/१०/पोउपनि-प्रशि/६५२/९६/२०१०, दि.८.१०.२०१०
८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे आदेश क्र.पोमसं/५/१०/पोउपनि/सत्र-१०३/ वाटप/१३६/२०११, दि.१५.०९.२०११
९) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांचे आदेश क्र. ई-१/प्रलि(१३)-२०११/ २०१३-१४/३२०४, दि.१९.०४.२०१४
१०) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि. १२.०१.२००७
११) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.सेनिवे-१००८/९६/सेवा-४, दि.३.११.२००८
१२) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अंनियो-१००९/३२/सेवा-४,दि.१८.८.२००९
१३) वित्त विभाग,शासन निर्णय क्र. सेनिवे १००८/प्र.क्र.१६/सेवा ४, दि.१९.०७.२०११
१४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.सेनिवे १००८/प्र.क्र.१६/सेवा ४,दि. ३.०८.२०११
१५) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.सेनिवे-१००८/१६/सेवा-४,दि. २८.०९.२०१२

१६)अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्रमांक-पोमसं/५/१०/पुर्वीची सेवा जोडून मिळणे/धनंजय ढोणे/१२३/२०२३, दि.१५.०२.२०२४

**प्रस्तावना:-**

श्री. धनंजय सावताराम ढोणे,यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत "पोलीस उप निरीक्षक" पदावर निवड झाल्यानंतर, पोलीस उप महानिरीक्षक, पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांच्या दि.०८.१०.२०१० रोजीच्या आदेशानूसार, श्री.ढोणे यांना महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक म्हणून दि.१९.०९.२०१० रोजी नेमणूक दिली. तद्नंतर विशेप पोलीस महानिरिक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांच्या दि.१९.०४.२०१४ रोजीच्या आदेशान्वये श्री. ढोणे यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर नियमीतपणे सामावून घेण्यात आले. श्री. धनंजय सावताराम ढोणे यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती होण्यापूर्वी, मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिपद, परभणी यांच्या दि.२९.०७.२००३ रोजीच्या आदेशान्वये श्री. धनंजय सावताराम ढोणे यांची "शिक्षणसेवक" या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. तद्नंतर श्री.ढोणे यांनी "शिक्षण सेवक" पदावरील तीन वर्पाचा सेवाकालावधी समाधाकारकरित्या पूर्ण केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिपद, परभणी यांच्या दि.०५.१२.२००६ रोजीच्या आदेशान्वये त्यांना "प्राथमिक शिक्षक" पदावर नियमित नियुक्ती देण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिपद, उस्मानाबाद यांच्या दि.२४.०५.२००७ च्या आदेशान्वये श्री. ढोणे यांची केंद्रीय प्राथमिक शाळा, खडका ता.सोनपेठ जि. परभणी येथून जिल्हा परिपद प्राथमिक शाळा सापनाई ता. कळंब, जि. उस्मानाबाद येथे आंतरजिल्हा बदली करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिपद, उस्मानाबाद यांच्या दि.२६.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये श्री. ढोणे यांना पोलीस उपनिरिक्षक मुख्य परिक्षा-२००९ या परीक्षेस बसण्यास मान्यता देण्यात आली.

पोलीस उप निरीक्षक मुख्य परिक्षा-२००९ मधून श्री.ढोणे यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाल्यानंतर त्यांनी केलेल्या विनंतीच्या अनुपंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिपद,

उस्मानाबाद यांच्या दि.२७.०८.२०१० च्या आदेशान्वये श्री. ढोणे यांना प्राथमिक शिक्षक पदावरुन कार्यमुक्त करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुपंगाने मुख्याधापक, जिल्हा परिपद प्राथमिक शाळा, सापनाई ता. कळंब, जि. उस्मानाबाद यांच्या दि.१८.०९.२०१० रोजीच्या पत्रान्वये श्री. ढोणे यांना दि.१८.०९.२०१० रोजी जिल्हा परिपद प्राथमिक शाळा, सापनाई येथून कार्यमुक्त करण्यात आले. त्यानुसार श्री. ढोणे हे दि.१९.०९.२०१० रोजी महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे रुजू झाले. श्री.ढोणे यांच्या दोन्ही सेवेमध्ये खंड पडलेला नाही.

पोलीस उपनिरीक्षक पदाचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या दि.१५.०९.२०११ रोजीच्या आदेशान्वये श्री. ढोणे यांची प्रात्याक्षिक प्रशिक्षणासाठी कोल्हापूर परिक्षेत्र येथे नेमणुक करण्यात आली. विशेप पोलीस महानिरिक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांच्या दि.१९.०४.२०१४ रोजीच्या आदेशान्वये श्री. ढोणे यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर नियमीतपणे सामावून घेण्यात आले.

श्री. धनंजय सावताराम ढोणे, यांची “शिक्षण सेवक”, व “प्राथमिक शिक्षक” पदाची पूर्वसेवा “पोलीस उप निरीक्षक” पदाच्या सेवेस जोडून देणेबाबतचा प्रस्ताव अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय यांनी संदर्भ क्र.१६ येथील दि.१५.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यानुसार श्री. ढोणे यांची पूर्वसेवा जोडून देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

श्री. धनंजय सावताराम ढोणे हे वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.१२.०१.२००७ परिच्छेद क्रमांक २ व वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.१८.०८.२००९ मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या (i) ते (iv) येथील अटींची पूर्तता करत असल्याचे दिसून येते. सबब, श्री. धनंजय सावताराम ढोणे यांची यांची दि.०४.०८.२००३ ते ०३.०८.२००६ या कालावधीतील “शिक्षणसेवक” व दि.०४.०८.२००६ ते दि.१८.०९.२०१० या कालावधीतील “प्राथमिक शिक्षक” पदावरील सेवा दि.१९.०९.२०१० पासूनच्या पोलीस उपनिरीक्षक पदाच्या सेवेस निवृत्तीवेतनाच्या प्रयोजनार्थ जोडून देण्यास तसेच श्री. ढोणे यांना

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), नियम, १९८२ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाने या विभागाच्या नस्ती क्र.पोलीस १८१७/प्र.क्र.२५८/ पोल-५अ वर दि.३०.११.२०१८ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०७३०१५४५२६६९२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUGRIV SAMBHAJI DHAPATE

Digitally signed by SUGRIV SAMBHAJI DHAPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FC102DE27DC1B41E747AC6CBB491C4209459C3CF340720EA98FD1D95B19C9F65, cn=SUGRIV SAMBHAJI DHAPATE
Date: 2025.07.30 15:46:05 +05'30'

**( सुग्रिव धपाटे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
३. अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
५. पोलीस अधीक्षक, लातूर/बीड
६. महालेखापाल (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२ , मुंबई/नागपूर
७. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर/बीड
८. श्री. धनंजय सावताराम ढोणे, सहायक पोलीस निरीक्षक (पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत)
९. निवडनस्ती( पोल-५अ)